# सहसंचालक, तंत्र शिक्षण संचालनालय,

प्रादेशिक कार्यालय, शासकीय तंत्र निकेतन परीसर, सदर, नागपूर.

दुरध्वनी क्र. ०७१२–६४६५१४५/१४६ E-mail:ronagpur.dte@gmail.com फॅक्स क्र. ०७१२–२५६१६६३

Web Site : rdtenagpur.org.in


क्रमांक :– तंशिस/प्राकाना/शैवि–३/माहिती/२०१४/3249

दिनांक : / /२०१४ 16 OCT 2014

प्रति,

सर्व प्राचार्य,
शासकीय, अशासकीय अनुदानित व विना अनुदानित
पदवी व पदव्युत्तर पदवी संस्था.
(नागपूर विभाग, नागपूर)

**विषय :– तंत्रशिक्षण संचालनालयाशी संबंधीत कामकाजाचा आढावा घेण्याबाबत मा. प्रधान सचिव, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय यांचे दालनात झालेल्या बैठकीबाबत.....**

संदर्भ :– मा. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा.,मुंबई यांचे पत्र क्र. २/एनजीसी/(प्र.स.बैठक/२०१४)/१२६५, दि. ०१ आक्टो. २०१४.

उपरोक्त संदर्भांकित विषयाच्या अनुषंगाने मा. प्रधान सचिव, महाराष्ट्र शासन, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, यांचे दालनात दि. २३.०९.२०१४ रोजी सादरीकरण करण्यांत आले. सदर सादरीकरणाच्या वेळी संचालनालयाशी संबंधित कामकाजाच्या घेतलेल्या आढाव्यास अनुसरून व्यावसायिक अभ्यासक्रमाचा गुणात्मक दर्जा वाढण्यासाठी मा. प्रधान सचिवांनी खालील मुद्यांबाबत त्वरीत कार्यवाही करण्याचे निर्देश दिले आहेत.

१. व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या संस्थामध्ये समुचित प्राधिकरणाने निर्धारित केलेल्या मानकांनुसार सोयी सुविधा यांचे नियमित परिक्षण/तपासणी करून निदर्शनास आलेल्या त्रुटींची पुर्तता न करणा–या संस्थावर कार्यवाही करणे.
२. अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेच्या मानकांनुसार आवश्यक असलेल्या अध्यापकांची परिषदेने निर्धारीत केलेल्या शैक्षणिक अर्हता धारक उमेदवारांची नियमित तत्वावर नियुक्ती करून विद्यापीठ तथा सक्षम प्राधिका–यांची मान्यता घेवून मान्यताप्राप्त अध्यापकांची माहिती संस्थेच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करावी.
३. संस्थेतील ट्रेनिंग व प्लेसमेंट सेल व्दारे संस्था व स्थानिक तसेच संबंधित उद्योगधंदे यामध्ये समन्वय साधून विद्यार्थ्यांना रोजगाराच्या संधी उपलब्ध होण्यासाठी प्रयत्न करावेत. जेणेकरून व्यावसायिक अभ्यासक्रम पूर्ण झाल्यानंतर विद्यार्थ्यांना रोजगाराच्या संधी निर्माण होतील.
४. व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या संस्थानी उद्योगधंद्याशी समन्वय साधून CSR प्रकल्पांतर्गत अध्यापकांना संबंधित उद्योगात प्रशिक्षण, उद्योगाभिमूख प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित करून विद्यार्थ्यांना संबंधित उद्योगक्षेत्रात प्रशिक्षण, उद्योगधंद्याच्या सहकार्याने संशोधन प्रकल्प (Industry Collaborative Research Projects) राबविणे, उद्योगधंदे व संस्थानी एकत्रित येऊन निरंतर शिक्षणासाठी सामंजस्य करार (Industry and Institute MoU for Collabarative continuous Education) इ. बाबी गुणवत्ता वाढीच्या दृष्टीने राबविणे.
५. व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या संस्थांनी एनबीएचे मानांकन करणे, ज्या संस्थांनी एनबीए मानांकनाकरीता अर्ज केले असतील त्यांनी त्याचा पाठपुरावा करून मानांकन त्वरेने मिळविण्यासाठी जोमाने प्रयत्न करावे.

६. अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद/विद्यापीठ अनुदान आयोगाने निर्धारीत केलेल्या मानकांनुसार सर्व बाबींची पूर्तता होत नसल्यास विद्यापीठ/महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ कायदयातील तरतूदीनुसार तात्काळ कार्यवाहीसाठी संबंधित प्राधिकरणाकडे प्रस्तावित करणे.
७. शैक्षणिक अन्वेक्षणाच्या आधारे संस्थेचा सर्वसाधारण गुणात्मक दर्जाची माहिती संकेतस्थळावर सर्वांसाठी अवलोकनार्थ खुली करणे.

तरी मा. प्रधान सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन, मुंबई यांनी दिलेल्या निर्देशाप्रमाणे उपरोक्त मुद्यांबाबतची पुर्तता तात्काळ करण्यांत यावी.

(गुलाबराव ठाकरे)
सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,
नागपूर

प्रत : मा. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा.,मुंबई (का.क्र. २) यांना मानार्थ सादर.